# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 26/03/2021 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

### दुखापत

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 3 कि. मी अंतरावर वार्ड क्र. 5 तुरकमारी येथे दिनांक 24/03/2021 चे 22:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविन्द्र गोविंदराव देवगडे वय 69 वर्ष, रा. प्लॉट नं. 164 हनुमान नगर ता.जि. नागपूर हे आपल्या बहिण नामे– कमल विनायक गावंडे, रा. तुरकमारी यांची शेती तुरकमारी व भारकस येथे आहे. शेतीला लागुनच गुरे ढोरे बांधण्याकरीता गोठा आहे. दि. 24/03/2021 रोजी गोठयाला वॉल कंपाउंड बांधण्याकरीता मजुरांच्या सहायाने खड्डे करीत असता घराचे बाजुला राहणारे आरोपी 1) महादेव पुंडलीक आदमने, 2) रोहन महादेव आदमने दोन्ही रा. तुरकमारी, वार्ड क्रं. 5 हे म्हणाले की, ''ही तुमची जागा नाही आहे, काम बंद करा'' असे म्हणुन फिर्यादी व त्यांच्या बहिणी सोबत झगडा भांडण करुन शिवीगाळ करीत होते. तसेच आरोपीतांनी लाकडी काठीने फिर्यादीच्या हातापायावर व डोक्यावर मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध धेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ खंडारे मो.क्रं. 9923159153 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर